बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ४७ | बुधवार, दि.३० ऑक्टोबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## एका बिबट्याचा चिलखात फसून, तर दुसऱ्याचा झाडावरुन पडून मृत्यू

### देवरी आणि तिरोडा तालुक्यातील घटना, वन्यजीव विभागाने सुरु केला तपास

**गोंदिया:** संसर्गामुळे आजारी असलेल्या एक बिबट्याचा जंगलातील चिखलात फसून तर दुसऱ्याचा झाडावरुन पडून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.२८) दुपारी देवरी आणि तिरोडा तालुक्यात उघडकीस आली. या दोन्ही घटनांचा तपास वन व वन्यजीव विभागाने सुरु केला आहे.

गोंदिया वनविभातील उत्तर देवरी वनपरिक्षेत्रांतर्गत सहवन क्षेत्र सावली नियतक्षेत्र डोंगरगावमधील कक्ष क्रमांक ५५५ संरक्षित वन क्षेत्रात सोमवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास एक बिबट सिमेंट बंधाऱ्याच्या चिखलात फसून मृतावस्थेत गस्तीवर असलेल्या वन कर्मचाऱ्यांना आढळला. या घटनेची माहिती प्राप्त होताच उत्तर देवरी वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी, क्षेत्र सहायक, वनरक्षक हे पशुवैद्यकीय अधिकारी यांच्यासह घटनास्थळी पोहोचून मृत बिबट्याचा पंचमाना केला. मृत बिबट्याचे सर्व अवयव शाबूत असल्याचे आढळले.



**यांच्या उपस्थितीत केले बिबट्यांचे शवविच्छेदन**

**उपवनसंरक्षक प्रमोदकुमार पंचभाई, सहायक वनसंरक्षक सचिन डोंगरवार, वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तर देवरी, वनपरिक्षेत्र अधिकारी तिरोडा, मानद वन्यजीव रक्षक सावन बहेकार, रुपेश निंबाते यांच्या उपस्थितीत पशुवैधकिय अधिकारी यांनी मृत दोन्ही बिबट्यांचे शवविच्छेदन केले. मृत बिबट्यांच्या अवयवाचे नमुने उत्तरीय तपासणीकरिता सीलबंद करण्यात आले. दोन्ही बिबट मृत्यृ प्रकरणाची उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक वनसंरक्षक (रोहयो व व वन्यजीव) गोंदिया हे तपास करीत आहेत.**

प्राथमिक तपासात बिबट्याचा सिमेंट बंधाऱ्याचा चिखलातील गाळात फसल्याने मृत्यु झाल्याचे पुढे आले. तर दुसरी घटना तिरोडा वनपरिक्षेत्रातील भजेपार वनक्षेत्रातील मौजा भजेपार येथील कक्ष क्रमांक ६५ संरक्षित वनक्षेत्रार दुपारी १२ वाजेच्या सुमारास एक बिबट मृतावस्थेत आढळला. या घटनेची माहिती मिळताच तिरोडा वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी, क्षेत्र सहायक, वनरक्षक, पशुवैद्यकीय अधिकारी आर.जी.शेंडे, यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृत बिबट्याचे सर्व अवयव शाबूत असल्याचे आढळले. या बिबट्याचा मृत्यू झाडावरुन पडून पोटाच्या भाागात गंभीररीत्या जखमी होऊन झाल्याच प्राथमिक तपासात आढळले.

## डॉ.सुगत चंद्रिकापुरेचे "शक्तिप्रदर्शन" आमदार बच्चुभाऊ कडु यांचा रोड शो



**गोंदिया.** अर्जुनी मोर. विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांची राष्ट्रवादी कांग्रेस महायुतीने ऐनवेळी उमेदवारी कापल्याने या अन्यायाविरोधात बंड पुकारुन आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी आपला मुलगा डॉ.सुगत चंद्रिकापुरे यांना पुढे करुन अर्जुनी मोर विधानसभेच्या आखाड्यात उतरवीले आहे.आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे शेवटच्या दिवशी हक्काचा माणुस डॉ.सुगत चंद्रिकापुरे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत प्रहार पक्षातर्फे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.यावेळी प्रहारचे अध्यक्ष आमदार बच्चु कडु, आमदार मनोहर चंद्रिकापुरे व प्रहारचे पक्षाचे उमेदवार डॉ.सुगत चंद्रिकापुरे यांनी हजारो कार्यकर्त्यांच्या रॅली सह अर्जुनी मोर. शहरात रोड शो केला.प्रसन्ना लॉन अर्जुनी मोर. येथुन ढोल ताशांच्या गजरात रॅलीला सुरवात झाली.खुल्या गाडीत आमदार बच्चुभाऊ कडु,आमदार मनोहर चंद्रिकापुरे,स्वतंत्र उमेदवार डॉ.सुगत चंद्रिकापुरे यांनी आपल्या परिवारासह हजारो महीला पुरुष व कार्यकर्त्यांसह शहराचे मुख्य मार्गाने महाराणा चौकापर्यन्त अभुतपूर्व रॅली काढून जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

**वंहुआघाडीचे उमेदवार दिनेश पंचभाई यांचा उमेदवारी अर्ज दाखल**

६३-अर्जुनी मोर विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिनेश रामरतन पंचभाई उपविभागीय कार्यालय अर्जुनी मोरगांव येथील उपविभागीय अधिकारी वरूनकुमार शहारे यांच्याकडे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिनेश पंचभाई यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

## ईसमास २० वर्षाचा सश्रम कारावास

**अर्जुनी/मोरगाव :** नात्यात भाची लागणाऱ्या पाच वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपी नराधम मामाला गोंदियाच्या प्रमुख जिल्हा व विशेष सत्र न्यायालयाने सोमवार दि.२१ ऑगस्ट २०२४ रोजी २० वर्ष सश्रम कारावास व १२ हजार रुपये दंड आणि शिक्षा ठोठावली आहे.तौसिफ शेख वय २३ वर्ष ता.अर्जुनी/मोरगाव जि.गोंदिया असे शिक्षा ठोठावण्यात आलेल्या नराधम मामाचे नाव आहे.

अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील केशोरी पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी तौसिफ्फ शेख इसाक शेख हा नात्यात पीडित चिमुकलीचा मामा लागत असुन घटनेच्या दिवशी १५ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी दोन वाजता सुमारास पीडित चिमुकली ही अंगणवाडीतून घरी परत आल्यानंतर तौसिफच्या घरी गेली यावेळी आरोपी तौसिफ हा आंघोळ करत होता निर्मिती त्याच्या जवळ गेली असता त्याने तिला आंघोळ करून देण्याच्या नावावर तिच्या अंगावरील कपडे काढून आंघोळ घातली दरम्यान तिच्या गुप्तांगाला स्पर्श करत लैंगिक अत्याचार केला यानंतर आरोपीने याबाबद जर कोणाला सांगितले तर पिडीतेला जीवे मारण्याची धमकी दिली होती.

## विमान,रेल्वे स्टेशन उडविण्याच्या धमक्या देणारा युवक ताडगावचा रहिवासी

**नागपूर–** मागील काही काळापासून देशात धमकीचे कॉल आणि ईमेलच्या घटना सातत्याने समोर येत होत्या. या धमक्यांच्या मदतीने विमाने आणि महत्त्वाची ठिकाणे बॉम्बने उडविण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या. दरम्यान, आता या सर्व अफवा असल्याचे सिध्द झाले आहे. राज्यातील विदर्भातील गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील ताडगाव येथील मूळ रहिवासी असलेला जगदीश उईके या ३५ वर्षीय व्यक्तीचा या धमकी संदेशामागे हात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, जगदीश उईके दहशतवादी कथांचा लेखक असल्याचेही समोर आले आहे. जगदीश उईकेला याआधी २०२१ मध्ये अटक करण्यात आली होती. विमान कंपन्या, रेल्वे स्टेशनसह ३० ठिकाणी बॉम्बस्फ्रोट होणार असल्याचा ई-मेलही केला होता. याठिकाणी स्फोटाचं टूलकिट असल्याचा दावादेखील त्याने केल्याचे समोर आले.

आता रेल्वे स्टेशन, विमान कंपन्या यांना धमक्या



देणारा गोंदिया येथील रहिवासी असल्याचे उघड झाले आहे.

जगदीश उईके याने पंतप्रधान मोदींना भेटण्याचा प्रयत्न केला असून त्याला शोधाची माहिती देऊ शकेल. आपल्याकडे दहशतवादी हल्ल्यांशी संबंधित काही खास माहिती असल्याचा दावा उईके याने केला. या प्रकारानंतर रेल्वे स्थानकांवर सुरक्षा वाढवण्यात आली असून विमान कंपन्या आणि दहशतवादविरोधी पथकेही सतर्क झाली आहेत. जगदीश उईकेने दहशतवादावर एक पुस्तकही लिहिल्याचे समोर आले आहे.तो मानसिक आजाराने ग्रस्त असून गेल्या अनेक दिवसापासून गावात राहत नसल्याची सांगितले गेले.

## १० हजार कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार रविकांत बोपचेचा उमेदवारी अर्ज दाखल



**तिरोडा–**महाविकास आघाडीच उमेदवार रविकांत खुशाल बोपचे यांनी आज दिनांक २९ ऑक्टोबर रोजी मंगळवारला दुपारी तीन वाजता तहसील कार्यालय तिरोडा येथे १० हजार कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत नामांकन दाखल केले.

कुंभारे लॉन आयोजित मेळाव्यात महाविकास आघाडीत काँग्रेस,शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षासह इतर सहयोगी पक्षाच्यां कार्यकर्त्यांची अफाट गर्दी पाहायला मिळाली.त्यानंतर महाविकास आघाडीच्या वतीने सभेचे रॅलीत रुपांतर झाले जवळपास पाच किमी लांब असलेल्या या रॅलीत कार्यकर्त्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सौरभ रोकडे, माजी खासदार डॉक्टर खुशालचंद्र बोपचे,गोंदिया जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष राधेलाल पटले, तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष रमेश टेंभरे,गोंदिया तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष रमेश अंबुले,तिरोडा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ओम पटले,तिरोडा बाजार समितीचे माजी सभापती वाय.टी.कटरे,माजी जि.प.सदस्य कैलास पटले, गोरेगाव तालुका काँग्रेस अध्यक्ष जगदीश येरोला,भाकपचे राज्य सरचिटणीस हौसलाल रहांगडाले,अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा सचिव नाशिर घाणीवाला, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला जिल्हाध्यक्ष मंजू डोंगरवार,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष प्रकाश बघेले, शहराध्यक्ष पिंटू वंजारी, युवा अध्यक्ष रवी कुर्वे, अल्पसंख्यांक तिरोडा तालुका अध्यक्ष जानी सय्यद, महिला तालुकाध्यक्ष भाग्यश्री केळवदकर, महिला तालुका अध्यक्ष वैशाली शिवसेना ठाकरे गट अशोक अरोडा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पक्षाचे तालुकाध्यक्ष हेमराज अंबुले यांच्यासह मोठ्या संख्येत महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

**गोंदिया विधानसभेकरीता माजी आमदार गोपालदास अग्रवालांचे शक्तीप्रदर्शन**

गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष महाविकास आघाडीचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांनी यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज आज(दि.२९)दाखल केला.सर्कस मैदाने येथून निघालेली ही रॅली,गांधी प्रतिमा मार्गे गोरेलाल चौक,नेहरु चौक होत जयस्तंभ चौकात असलेल्या प्रशासकीय इमारतीसमोर पोचली.अर्ज दाखल करण्याआधी काँग्रेस उमेदवार विनोद अग्रवाल यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केले.





उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी आयोजित सभेला कॉग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड,बालाघाटचे आमदार अनभा मुंजारे,शिवसेना जिल्हाप्रमुख पंकज यादव,दानिश खान,के.आर.शेंडे,पी.जी.कटरे,झामसिह बघेले,अमर वराडे,रमेश अंबुले,योगेश अग्रवाल,जहिर अहमद,सुनिल भालेराव,माधुरी हरिणखेडे,विनोद जैन,पुरुषोत्तम कटरे,धन्नालाल नागरीकर,विजय बहेकार,बैहर आमदार संजय उईके,वारासिवनीचे आमदार विक्की पटेल,परसवाडाचे आमदार मधु भगत,वंदना काळे,सौरभ रोकडे,निलम हलमारे,पप्पू पटले,प्रकाश रहमतकर,अंकित जैन,मनोज पटनायक,अशोक गुप्ता,,अजय गौर,जितेश राणे यांच्यासह मोठ्या संख्यने पदाधिकारी उपस्थित होते.

## धनत्रयोदशीला सोन्याचे दर उच्चांकीवर

**नागपूर:** धनत्रयोदशीच्या एक दिवसापूर्वी सोन्याच्या दरात घसरण झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला होता. परंतु एनब धनत्रयोदशीला मंगळवारी (२९ ऑक्टोंबर) नागपुरात सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे सोने- चांदीचे दागिने खरेदीचा बेत आखलेल्या ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे. दरम्यान सोन्याच्या दरात वाढीनंतरही नागपुरातील बऱ्याच सराफ्फा दुकानात ग्राहकांनी सकाळपासून ग्राहकांनी गर्दी केली आहे.

दिवाळीमध्ये धनत्रयोदशीच्या मुहर्तावर ग्राहक मोठ्या संख्येने सोने- चांदीचे दागिने खरेदी करतात. परंतु हल्ली सोन्याच्या दर उंचीवर गेल्याने ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे. धनत्रयोदशीच्या एक दिवसापूर्वी नागपुरातील सराफ्फा बाजारात २८ ऑक्टोंबरला सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७८ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार रुपये नोंदवले गेले होते. त्यामुळे एक दिवसापूर्वीच्या तुलनेत हे दर किंचित कमी झाले होते. परंतु एन धनत्रयोदशीला दर वाढले.धनत्रयोदशीला मंगळवारी (२९ ऑक्टोंबर) बाजार उघडल्यावर सोन्याचे दर वाढले आहे. नागपुरातील २९ ऑक्टोंबरला सराफा बाजारात सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार २०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार ७०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार ८०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार ५०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे एनब धनत्रयोदशीला दरवाढीमुळे ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे.

## सावधान! दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बनावट मिठाईचा धोका!

**गोंदिया–** देशात सणासुदीची लगबग सुरु आहे.दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे.दरवर्षी सणासुदीच्या काळात मिठाईचा खप अनेक पटींनी वाढतो.सणासुदीत मिठाईचा खप वाढल्याने खाद्यपदार्थांमध्ये भेसळीचा धोकाही लक्षणीय वाढतो. या पार्श्वभूमीवर येत्या हंगामत मिठाईची वाढती मागणी लक्षात घेऊन भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणने काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.दुकानदारांना या सणासुदीच्या काळात दुकानदारांना खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्या आहेत.देशभरात ४००० राज्यस्तरीय अधिकाऱ्यांना दुकानदारांवर निगरानी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मात्र गोंदिया जिल्ह्यात वेगळीच परिस्थिती असून मिठाईच्या एकाही दुकानात प्राधिकरणाच्या निर्देशाचे पालन केले जात असल्याचे चित्र नाही.उलठ एकेकाळी एका दुकानाने सुरवात करणारे मिठाईवाल्यानी आज शहराच्या प्रत्येक चौकात दुकाने सुरु केल्याने खरंच यांच्या दुकानातील मिठाई मानकानुसार योग्य आहे काय अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

या मिठाई दुकानावर गोंदियाच्या अन्न औषध विभागाच्या अधिकाऱ्यांनी कधी कारवाई करुन नागरिकांना बनावट मिठाई खाण्यापासून परावृत्त केल्याचेही चित्र नाही.उलट दिवाळी आली की एकदोन कारवाईचा फार्स करुन आम्ही कारवाई करीत असल्याचा देखावा करुन दिवाळीची मिठाई आपल्या खिशात भरूनच जात असल्याची चर्चा आहे.दिवाळीच्या काळात परराज्यातून आलेल्या मिठाईवाल्यांच्या दुकानातून लाख रुपयाचे मिठाई पॅकेट दरवर्षी कारवाई न करण्याकरीता घेतले जात असल्याची चर्चा आहे.



आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दिवाळी किंवा सणासुदीच्या काळात बाजारात विकल्या जाणाऱ्या मिठाईत मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याचं दिसून येते.भेसळ करताना खाद्यपदार्थांमध्ये जास्त प्रमाणात स्टार्च मिसळला जातो.स्टार्चचे जास्त प्रमाण मूत्रपिंड आणि यकृतासाठी अत्यंत हानिकारक आहे.कधी-कधी मिठाईमध्ये फॉर्मेलिनचाही वापर केला जातो. फॉर्मेलिन वापर सामान्यतः मृतदेह दीर्घकाळ टिकवण्यासाठी केला जातो.मिठाईमध्ये फॉर्मेलिन सारखे केमिकल वापरणे अत्यंत हानिकारक असून ते घातक आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांसाठी हे अत्यंत हानिकारक आहे..या साहित्याची वापर करुन मिठाई विकणाऱ्या दुकानदारांनी काही राजकीय पाठबळ असलेल्या लोकांना हाताशी धरुन आपला हा काळा धंदा चालवून नागरिकांचे आरोग्य बिघडवण्याचे काम सुरु केले आहे.

मिठाईमध्ये प्रामुख्याने माव्याचा वापर केला जातो. दुधापासून बनविलेला मावा नाशिवंत असल्यामुळे लवकर खराब होतो.असा खराब मावा मिठाई बनविताना वापरला,तर आरोग्यावर दुष्परिणाम होतो आणि मावा घालून बनवलेली मिठाई फार काळ विक्रीस ठेवली तरीही नाशिवंत माव्यामुळे ती मिठाई खराबच होते.

ग्राहकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेची काळजी होणारा असा नवा कायदा अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने २५ सप्टेंबर २०२० रोजी जारी केला; ज्याद्वारे मिठाईच्या दुकानात पेप-Packed/loose असलेल्या कंटेनरमध्ये आणि ट्रेमध्ये ठेवलेल्या मिठायांवर `Best Before date' टाकणे/घालणे बंधनकारक केले.मात्र गोंदियातील कुठल्याही मिठाईच्या दुकानातील मिठाईच्या पॅकेटवर असे लिहिलेले मिळायलाच मिळत नाही.

नव्या कायद्यानुसार उत्पादकांना अन्नपदार्थांवर कालमर्यादेचा उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मिठाईमध्ये असलेल्या खव्यामुळे (खराब) अन्नातून विषबाधा होऊ शकते, ही बाब ध्यानात घेऊन या कायद्याची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना गोंदियात यास तिलाजंली दिली जात आहे.

या मिठाईच्या बाबतीत एक खबरदारी म्हणजे त्यावर लावण्यात येणारा हा वर्ख चांदीचा असल्याचा दावा करण्यात येतो.चांदीचा सध्या असलेला भाव पाहता सर्रास चांदी वापरली जाते का? हा प्रश्न मनात नक्की उपस्थित होतो. चांदी ऐवजी अल्युमिनियम या धातूचा पातळ पत्रा जो चांदीच्या वर्खाप्रमाणे पातळ बनतो तो वापरला जातो. चरबीच्या दोन थरांमध्ये चांदी ऐवजी ॲल्युमिनियमचा पत्रा ठेवून त्यावर धोपटले जाते व अति पातळ पत्रा बनविण्यात येतो. हीसुद्धा भेसळच आहे. ॲल्युमिनियमचे बारीक कण आतड्यांना चिकटून राहतात. त्याचे विघटन होत नाही आणि सातत्याने ॲल्युमिनियम पोटात गेल्यास अल्सर आणि नंतर कॅन्सरसारखे दुर्धर आजार उद्भवतात. चांदीच्या वर्ख ओळखण्यासाठी जर चिमटीमध्ये वर्ख धरला आणि कुस्करला तर त्याची पावडर होते, तर अल्युमिनियमचा पातळ पत्रा चिमटीमध्ये धरला आणि कुस्करला तर त्याची टणक गोळी बनते.

मिठाईवर खूप वेळा केशराचे मोठे तंतू लावलेले दिसतात. मक्याच्या कणसाचे तंतू मेटॅनिल यलो या अखाद्य रंगामध्ये बुडवून ते वाळवून वापरले जातात. मेटॅनिल यलोसारख्या अखाद्य रंगामुळे शरीरास अपाय होतो, अपंगत्व येते. याबरोबरच वनस्पती तेल, मिल्क पावडर आणि साखरेचे मिश्रण यापासून बनवला गेलेला, पूर्णपणे नकली मावा बाजारात स्वस्तात उपलब्ध होतो.

अशा संभाव्य धोक्यांमुळे जागरूकपणे येत्या दिवाळीत नागरिकांनी खरेदी करतांना काळजी घेणे आवश्यक असून सोबतच दुकानदाराकडे बिल मागण्यास मात्र विसरु नये जेणेकरुन कुणालाही या मिठाईपासून विषबाधा झाल्यास दुकानदारावर कारवाई करण्यास मदत होईल.

## अखेर सर्वोच्य न्यायालयातून नगर परिषद आमगाव न्याय प्रविष्ट प्रकरण परत

**आमगाव:** नगर परिषद आमगाव येथील मागील २०१७ पासून न्यायप्रविष्ठ प्रकरण अखेर राज्य सरकारने सर्वोच्य न्यायालयातून आज न्यायालयातून परत घेतल्याने जनतेचा लढा मार्गी लागणार आहे. नगर पंचायत ते नगर परिषद स्थापनेचा लढा हा राजकीय पुढा?्यांसाठी जरी प्रतिष्ट्चा ठरला असेल परंतु या लढाईत मात्र जनतेचा न मिळालेल्या योजनांचा नुकसान अधिक ठरला आहे. राज्य सरकार ने २०१७ ला राज्यातील तालुका स्थळ गावांना नगर पंचायत निर्माण करण्याचे आदेश निर्गमित केले होते, यात आमगाव ग्रामपंचायत ला हि नगर पंचायत चा दर्जा देण्यात आले होते. या आदेशाला आवाहन देत काही पुढा?्यानी नगर परिषद ची मागणी करीत राज्य सरकार च्या आदेशाला सर्वोच्य न्यायालय खंडपीठ नागपूर येथे आवाहन दिले होते. यात सर्वोच्य न्यायालय खंडपीठ नागपूर ने नगर परिषद स्थापने बाबद राज्य सरकारने निर्णय घ्यावे असे आदेश देण्यात आले होते.

सर्वोच्य न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या आदेशाप्रमाणे राज्य सरकारने आमगाव सह सात गावांना समायोजीत करून नगर परिषद स्थापने बाबद राज्य सरकारने निर्णय घेऊन आदेश




निर्गमनीत केले होते. आमगाव नगर परिषद स्थापनेनंतर नगर परिषदची निवडणूक रणधुमाळी सुरु असतांनाच तिरथ येटरे व निकेश मिश्रा सह काही पुढा?्यानी राज्य सरकारच्या नगर परिषद स्थापना अधिसूचनेला सर्वोच्य न्यायालय खंडपीठ नागपूर येथे आवाहन दिले होते,यात मा न्यायालयाने नगर परिषद चे स्थापना आदेश रद्द करीत, राज्य सरकारने नगर परिषद स्थापना करताना नागरिकांचे आक्षेप निकाली काढून नंतर नगर परिषदचा निर्णय घेण्याचे आदेश दिले.

त्याममुळे नवीन पेच निर्माण झाल्याने तोंडावर असलेली निवडणूक स्थगित ठेवण्यात आले होते. परंतु राज्य सरकारने या आदेशाला सर्वोच्य न्यायालय दिल्ली येथे नागपूर खंडपीठ ने दिलेल्या आदेशाला आवाहन देत स्थगिती मिळविली होती.परंतु प्रकरणाला स्थगिती मिळवून हि न्याय निवाळा होत नसल्याने सदर स्थगीती आदेश व याचिका सर्वोच्य न्यायालयातून परत घेतली. मागील आठ वर्षांपासून न्याय प्रविष्ट प्रकरणाने नागरिकांना कोणत्याच योजनांचा लाभ मिळत नसल्याने नागरिक या प्रकरणामुळे तीव्र संताप हि वेंक्त करीत होते.

नगर परिषद संघर्ष समितीने नागरिकांची भूमिका ठाम ठेवत अनेक आंदोलने उपोषणे केली. तर निवडणुकीत मतदानावर बहिष्काराची भूमिका हि समोर ठेवली होती. आज राज्य सरकारने घेतलेली भूमिका नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी सार्थक ठरेल अशी माहिती नगर परिषद संघर्ष समितीने वेक्त केली आहे.

## संपादकीय

# दीपपर्व ;आनंदाची पर्वणी

भारतासह विदेशातही दिवाळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वजण आपापल्या परीने दिवाळी पर्वाचा आनंद लुटतात. हिंदुसंस्कृतीतील सर्वांत मोठा सण म्हणूनही दीपोत्सवाला महत्त्व आहे. प्रत्येकाच्या अंगणात तिमिराला घालवून प्रकाशकिरणे पसरविणारा हा सण. अंधाराकडून उजेडाकडे नेणारी ही दिवाळी प्रत्येकाच्या मनात घरात मांगल्य घडविणारी असते. अशा या दिवाळीनिमित्त सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा.

देशभर दिवाळी साजरी करण्याच्या वेगवेगळ्या प्रथा–तऱ्हा आहेत. धनत्रयोदशीपासून सुरू होणारी दिवाळी नरकचतुर्थीच्या दिवशी आपल्यातील नरकरुपी पाप, अहंकाराचे उच्चाटन केले जाते. लक्ष्मीपुजनासोबतच ग्रामीण भागातील महत्त्वाचा दिवस म्हणजे बलीप्रतिपदेचा. शेतकरी आपल्या राजा बळीराजाची पूजा अर्चना मोठ्या भक्तिभावाने करतात. अशा या मांगल्याचे प्रतीक असलेल्या दिवाळीच्या निमित्ताने माणसातील प्रकाशतत्वाचे प्रफुल्ल प्रक्षेपण अनुभवता येते. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने देखील या सणाचे माहात्म्य आहे.

दिव्यांचे वैविध्यपूर्ण आणि कलात्मक प्रकार आहेत. त्यांचे सांस्कृतिक स्थान मात्र अनन्यसाधारण आहे. ज्योती अनेक पण प्रकाशतत्व एकच. शरीर म्हणजे पणती व त्यातील ज्योत म्हणजे प्राण, असे थोर संत सांगून गेले.

संतांच्या दृष्टिकोनातून स्वतःला अंतर्मुख करून टाकणारे हे प्रकाशपर्व आहे. हे प्रकाशपर्व शेतकरी, कष्टकरी, गरीब, श्रीमंत सर्वांच्या अंगणात आले आहे. प्रत्येक जण आपल्या लायकीप्रमाणे हा सण साजरा करीत असतो. पण या सणात दरवळणारा सुगंधतत्व मात्र एकच आहे.

पूर्व विदर्भातील जिल्हे धानपिकाचे.

सध्या कापणीचा हंगाम सुरू असला निसर्गाने मात्र आपला कोप दाखविण्यास सुरवात करीत आहे. यामुळे या दिवाळीला हातात आलेले पीक मात्र अडचणीत सापडण्याची भिती निर्माण झाली आहे. तरी निसर्गापुढे काही चालत नाही. या नियतीला सामोरे जाऊन आपल्या परीने तो प्रकाशपर्व साजरा करण्यासाठी अंधारातून दिव्यांच्या उजेडात प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी प्रत्येक जण मात्र सज्ज झाला आहे. दीन दुबळ्यांसह सर्वांची दिवाळी दीपोत्सवाच्या उजेडाने न्हाऊन निघावी हीच अपेक्षा.

१३ वर्षापासून जनतेच्या वाचकांच्या सेवेत पुर्व विदर्भात जिल्ह्यात हिंदी भाषिकांची मोठी संख्या असतांनाही मराठीची अस्मिता टिकवून ठेवत निर्भिड, जनसामान्यांचे व्यासपीठ म्हणून बेरार टाईम्सने आपली जागा कायम केली आहे.

वाचक, जाहिरादार व वितरक तसेच हितचिंतकांच्या प्रेमापोटी दिपोत्सव विषेशांक २०२३ साकारु शकलो आहे. या दिपोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यातील बेरार टाईम्सचे हिंतचिंतक, वाचक जाहिरातदार, प्रतिनिधी वितरक व जनतेला दिवाळीच्या

हार्दिक शुभेच्छा.

बळीराजा बळ दे..
गौतम बुद्धा, बुद्धी दे..
जिजाऊ माते प्रेरणा दे..
शिवराया युक्ती दे..
तुकोबाराया ज्ञान दे..
शंभूराजा शक्ती दे..
उमाजीराजा शौर्य दे..
ज्योतिबा त्यागाची भावना दे..
सावित्रीमाई संयम दे..
भीमराया शिक्षणाची आस दे..
शाहूराजा तळमळ दे..
अण्णा भाऊ लेखणी दे..
अहिल्यामाई जनसेवेची इच्छा दे..इडा–पीडा टळू दे, बळीचे राज्य येवू दे..


**खेमेंद्र कटरे–मुख्य संपादक**

# इडा पिडा टळों बळीचे राज्य येवों

शेतकरी विरोधी नेत्यांना फटाके लावून बळीराजा महोत्सव साजरा करुया! समतावादी बळीराजा, कपटी वामणाचा पराभव एक दिवस नक्की करेल हा आत्मविश्वास बळीराजा महोत्सव पर्वावर बळीच्या वारसांमध्ये वाढत जावोत, आणि समतेचे बळीराज्य येवो! या समस्त शेतकरी कष्टकरी बहुजन भावंडांना हार्दीक सदीच्छा!

शेतकऱ्यांना दुर्लक्षित करणाऱ्या, अपमानीत करणाऱ्या व्यवस्थेला उलथून टाकण्याचे बळ, समस्त बळी वंशातील भूमिपुत्रांमध्ये येण्याच्या दृष्टीने बळी महोत्सव, दिपावली साजरी झाली पाहिजे. त्यासाठी फटाके फोडून बळीराजा महोत्सवाचा बेगडी आनंद घेण्याच्या ऐवजी, शेतकरी विरोधी, ओबीसी विरोधी, कष्टकरी, कामगार विरोधी, ओबीसींच्या जातीनिहाय जनगणना विरोधी नेत्यांना फटाके लाऊन बळीराजा महोत्सव साजरा करुया!

महात्मा जोतीराव फुले यांनी मशेतकऱ्यांचा असूडफ मध्ये विविध अंगांनी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणाची चर्चा केली. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध बाजुने होणारे शोषण समजून घेतले नाही तर, शेतकरी बहुजनांच्या शोषणाविरुद्धचा लढा निर्णायक स्थितीत येत नाही हा आजपर्यंतचा अनुभव आहे. शेतमालाचे भाव वाढीसाठी शेतकऱ्यांना वारंवार आंदोलन करण्यास भाग पाडणे देखील अनैतिक आहे, अन्यायकारक आहे. आज १०००० रुपये क्विंटल कापसाचा भाव परवडेल, परंतु दोन वर्षांनी तो न परवडणारा भाव ठरेल. त्यावेळी पुन्हा शेतकऱ्यांनी आंदोलन करावे का? शेतकऱ्यांना एवढा वेळ असतो का? यासाठी उत्पादन खर्चावर आधारित भाव, महागाई निर्देशांकानुसार भाव किवा इतर आणखी बाबींचा आधार घेऊन स्थायी स्वरुपाचा उपाय केला पाहिजे. त्यासाठी शेतकरी ओबीसी पोरांचा समावेश असलेला कृषी आयोग असला पाहिजे. शासन, प्रशासनात जातिव्यवस्थेत शुद्र ठरविलेल्या शेतकरी पोरांचा संख्या प्रमाणात भरणा असणे म्हणूनच अत्यंत गरजेचे आहे. केवळ आर्थिक मागण्यांचे आंदोलन हे शेतकरी न्यायाचे आंदोलन होत नाही, हे शरद जोशीच्या शेतकरी आंदोलनात आपल्या लक्षात आले. शरद जोशीनी महात्मा फुलेंच्या मशेतकऱ्याचा असूडफ या



ग्रंथाची आठवण करून ओबीसींना सोबत घेतले, परंतु त्याच ग्रंथातील प्रशासनात सर्व जातींची त्यांच्या संख्याप्रमाणात नेमणूक करण्याची गरज असल्याचे म. फुले यांचे मत लोकांच्या नजरेस आणले नाही.

शेतकरी हिताचे निर्णय होण्यासाठी ओबीसींच्या प्रतिनिधित्वाचा मुद्दा म.फुले अधोरेखित करतात आणि याउलट ओबीसींच्या प्रशासनात प्रनिधित्वाची तरतुद असलेल्या मंडल आयोगाला शरद जोशी उष्ट्या पत्रावळी म्हणतात. इथेच शेतकरी ओबीसी जातींचा घात केला जातो. म्हणून खऱ्या अर्थाने शेतकरी कष्टकरी हितासाठी लढायचे असेल तर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख, सत्यशोधक प्रबोधनकार ठाकरे, सत्यशोधक नारायण मेघाजी लोखंडे, सत्यशोधक केशवराव जेधे, सत्यशोधक दिनकरराव जवळकर, सत्यशोधक भास्करराव जाधव, सत्यशोधक व्यंकटराव गोडे, सत्यशोधक आनंदस्वामी इत्यादी असंख्य सत्यशोधक पुढाऱ्यांनी घेतलेल्या भूमिका मध्यवती ठेवून वाटचाल करावी लागेल. जातीव्यवस्था, धर्म व्यवस्था ह्या शेतकरी ओबीसी, बहुजन समाजाच्या शोषणाच्या मुख्य व्यवस्था असल्यानेच द्रष्टे महात्मा फुले यांनी ब्राम्हणी आडपडद्यात गुलामगिरी या ग्रंथात धर्माधारीत शोषणाची चिकित्सा केली. स्त्री–शुद्रातिशुद्र कष्टकरी शेतकरी कामगार यांच्या शोषणाची व्यवस्था असलेला वैदिक धर्म , मनुस्मृतीचा धर्म याचा धिक्कार महात्मा फुले करतात. अंधभक्तांच्या फितुरीमुळे ओबीसी, दलित, आदिवासींचे सामाजिक, आर्थिक न्यायाचे लढे एकत्रीतपणे पुढे जाण्यात अडथळे निर्माण झालेले आहे. याही लोकांना फटाके लावण्याचे काम बळीराजा महोत्सव पर्वावर आपल्याला करावे लागेल.

उठ ओबीसी जागा होती! संघर्षाचा धागा होता!

**बाबा बीडकर**

# कोट्यवधींच्या जप्त रकमेचे गौडबंगाल आहे तरी काय?

राज्यात विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी राजकीय पक्षांकडून सुरू आहे. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने, उमेदवारांवर आणि राजकीय पक्षांवर आयोगाकडून बंधने आली आहेत. त्यामुळे पूर्वीच्या काळी निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या उमेदवारांचे पोस्टर वॉर किंवा जी फलकबाजी व्हायची ती आयोगाच्या निर्बंधामुळे. रस्त्यावर निवडणूक सुरू आहे की नाही हे वातावरण तयार झाले नसले तरी या कालावधीत कोट्यवधी रुपयांच्या रकमा पोलिसांना सापडत असल्याने निवडणुका आणि पैसा यांचा कसा संबंध आहे, याकडे मतदारांचे लक्ष जात आहे. त्याचे कारण आदर्श आचारसंहिता असल्याने मतदारांना पैशांच्या आमिषाने आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करू नये, यासाठी तपास यंत्रणांची करडी नजर असली तरी, निवडणूक काळात होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीचा नेमका अर्थ काय काढायचा याचे कोडे खरे तर निवडणूक आयोगाने सोडवायला हवे, अशी सामान्य मतदारांची अपेक्षा असू शकते.

तसेच, पोलीस कारवाईत जप्त केलेल्या रकमेची किंवा मालमत्तेचे पुढे काय होते याबाबत सर्वसामान्य नागरिकांना उत्सुकता कायम राहिलेली आहे. त्यात पुण्यातील खेड– शिवापूर टोलनाक्यावर पुणे पोलिसांकडून पाच कोटी रुपयांची रक्कम जप्त केली होती. एका पांढ?या रंगाची इनोव्हा कारची तपासणी करताना, त्यामध्ये ५०० रुपयांच्या बंडलमध्ये पाच कोटी रुपये सापडले, असे पोलिसांकडून सांगण्यात आले असले तरी, त्या गाडीत १५ कोटी रुपये होते, असा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. आयकर विभागाकडे पुढील चौकशीसाठी ही रक्कम देण्यात आली असली तरी, ती गाडी नेमकी कोणाची होती, कोणत्या राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा या रकमेशी संबंध होता, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. त्यामुळे अशा प्रकरणामुळे सर्वसामान्य नागरिकांना कुतूहल निर्माण झालेले आहे. दुसरे एक मोठे प्रकरण म्हणजे, पुणे शहरात नाकाबंदी दरम्यान शुक्रवारी संशयित वाहनाची झडती घेताना, १३८ कोटी रुपयांचे सोने पोलिसांना सापडले. हे सोने नेमके कुठून आले? कुठे नेले जात होते? त्याचा मालक कोण? याचा आता पोलिसांकडून शोध सुरू करण्याअगोदर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये बातम्या झळकल्या. त्यामुळे हे सोने कोणाच्या मालकीचे याची चर्चा झाली. पोलिसांनी नंतर याचा खुलासा केला असला तरी पूर्ण खात्री होईपर्यंत माध्यमांपर्यंत चुकीच्या बातम्या येऊ नये याची खबरदारी निवडणूक आयोगाने घ्यायला हवी. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी राज्यातील सर्वच प्रमुख शहरात ठिकठिकाणी नाकाबंदी केली आहे, त्यात हे सोन्याचे घबाड सापडल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहे. विधानसभा निवडणुकीतील गैरप्रकार टाळण्यासाठी निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार खबरदारी घेण्यात येते. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात येत आहे. राज्यात अनेक ठिकाणी पोलिसांकडून कोट्यवधी रुपये जप्त करण्यात आले आहेत. त्या तपासणीत आता सोन्याची भर पडली आहे. कोणतीही



निवडणूक आली की खर्च आलाच. जिंकण्यासाठी ङ्गहोऊ दे खर्चफ, अशी उमेदवारांची भूमिका असते. त्यामुळेच निवडणूक आयोगाकडून उमेदवारांना खर्चाच्या मर्यादा घातल्या आहेत. तसा तपशील प्रतिदिन द्यावा लागतो. यावेळी विधानसभेसाठी खर्चाच्या मर्यादेत निवडणूक आयोगाने वाढ केली आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारांना ४० लाखांपर्यंत खर्च करता येणार आहे. यापूर्वी २८ लाख एवढा खर्च मर्यादा होती. यात निवडणूक आयोगाने १२ लाखांची वाढ केली आहे. मात्र, नाकाबंदीत ५ ते १० कोटींची रक्कम सापडत असेल, तर निवडणूक काळात किती पैशांचा पाऊस पडत असेल याचा विचार करता येईल. तसेच, निवडणुकीत गैरप्रकार टाळण्यासाठी आयोगाने धडक नियोजनाचा भाग म्हणून उमेदवारांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवले आहे. तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यातील सीमेवर तपासणी पथक तयार केली आहेत. त्याचवेळी आंतरराज्य सीमेवर पोलीस बंदोबस्त वाढवला आहे. दुसऱ्या राज्यातून अवैध वाहतुकीवर निर्बंध आणले आहे. तसेच सीमा नाक्यावर सीसीटीव्हीही बसवण्यात आले आहेत.

या कडक कारवाईची परिणती म्हणून रविवारी विदर्भात आणखी एक मोठी कारवाई झाली. मध्य प्रदेश महाराष्ट्राच्या सीमेवर सुमारे चार कोटी रुपयांचे सोने जप्त करण्यात आले. लोकसभा निवडणूक (२०२४) काळात होणाऱ्या पैशांच्या गैरवापरावर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यावर अंकुश ठेवण्यासाठी, आयकर विभागाच्या, पुणे शाखेने २४ ु ७ कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष स्थापन केला होता. हा नियंत्रण कक्ष दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सातही दिवस (२४ ु ७) कार्यरत होता. या कक्षात नागरिकांना त्यांच्या तक्रारी नोंदवता याव्यात यासाठी किंवा पैशांच्या गैरवापराची माहिती देता यावी यासाठी पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या जिल्ह्यांसाठी टोल फ्री क्रमांक, व्हॉट्सअॅप क्रमांक देण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीच्या काळातही नाकाबंदीत पैसे जप्त करण्यात आल्याच्या बातम्या आल्या होत्या; परंतु त्यात किती तथ्य आहे. पुढे संबंधित कारवाईबाबत काय झाले याची माहिती मिळत नसल्याने, हा फक्त कारवाईचा फार्स आहे का, अशी शंका निर्माण होण्यास वाव आहे.

पोलिसांनी जप्तीच्या केलेल्या कारवाईचा फटका एकाही लोकसभा उमेदवाराला बसल्याचे ऐकीवात नाही. त्यामुळे महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर राजकीय पक्षांचा प्रचार सभांचा धडाका सुरू आहे. त्याचवेळी निवडणूक आयोग सक्रिय झाला आहे, या पाच कोटींची रक्कम आणि सोने जप्त कारवाईवरून दिसून येत असले तरी, या कारवाईचे पुढे नेमके काय होते, हे पाहणे पुढील काळात महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# मतदान केंद्राधिकारी व अधिकारी यांचे प्रशिक्षण



**गोंदिया :** येत्या २० नोव्हेंबरला महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ संदर्भात सर्व विधानसभा क्षेत्रात जय्यत तयारी सुरू झालेली आहे त्याचाच एक भाग म्हणून ६३–अर्जूनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात मतदार संघात २६ व २७ ऑक्टोबरला मतदान केंद्राधिकारी व मतदान अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण संपन्न झाले.


सदर प्रशिक्षण दोन टप्प्यात पार पडले. प्रथम टप्प्यात त्यांना पीपीटी च्या साह्याने प्रशिक्षण देण्यात आले आणि द्वितीय सत्रात हँड्स ऑन ट्रेनिंग म्हणजेच प्रत्यक्ष मतदान यंत्र वापरण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

सदर प्रशिक्षण जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या मार्गदर्शनाखाली अर्जुनी मोरगाव येथील निवडणूक निर्णय अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी वरुणकुमार सहारे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे व सडक अर्जुनीचे तहसीलदार अक्षय पोयाम यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी वरूणकुमार शहारे व अनिरुद्ध कांबळे यांनी पीपीटी च्या साह्याने प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणाला जवळपास दोन हजार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर प्रशिक्षण कृषी उत्पन्न बाजार समिती येथे तर प्रात्यक्षिक प्रशिक्षण अर्जुनी मोरगाव येथील सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय येथे देण्यात आले. या प्रशिक्षणांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या कर्तव्याची आणि अधिकारांचे जाणीव करून देण्यात आली तसेच निवडणूक सुरू होण्यापूर्वी, सुरू असताना आणि नंतर करावयाची कामे जबाबदारीने आणि काळजीपूर्वक करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये मतदानाच्या वेळी मतदान यंत्रे हाताळणी बाबत तांत्रिक बाबी, मतदानाच्या दिवशी सर्व यंत्रे कार्यान्वित आहेत किंवा नाही याची खात्री करणे, वेळेवर मतदान सुरु करणे तसेच वेळेवर बंद करणे, दर दोन तासांनी मतदानाची टक्केवारी काढणे, मतदान प्रक्रिया सुरू होण्याअगोदर मॉक पोल घेणे, मतदान कार्यपद्धती ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट कसे हाताळावे, मतदानाच्या दिवशी मतदारांसाठी सुलभता व्हावी तसेच मतदान प्रक्रियेवेळी कोणतीही अडचण येऊ नये या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

# गोंदिया विधानसभा मतदार संघासाठी ८६०२ दिव्यांग मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**गोंदिया :** येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. गोंदिया विधानसभा मतदार संघातील दिव्यांग मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी त्यांना व्हील चेअर, रॅम्प, स्वयंसेवक यासह अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग मतदारांना रांगेत प्रतिक्षेत न राहता मतदान करण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्यामुळे दिव्यांगांना मतदान करणे सुलभ होणार असून गोंदिया विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ८ हजार ६०२ दिव्यांग मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.



गोंदिया विधानसभा मतदार संघात एकूण ८ हजार ६०२ दिव्यांग मतदार आहेत. त्यापैकी ६३–अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदार संघात १ हजार ६००, ६४–तिरोडा विधानसभा मतदार संघात १ हजार ९७८, ६५–गोंदिया विधानसभा मतदार संघात २ हजार ५२२, ६६–आमगाव विधानसभा मतदार संघात २ हजार ५०२ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, प्रतीक्षा शेड, वैद्यकीय किट, केंद्रांवर रॅम्प आणि व्हीलचेअरची सोय, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्याने प्रवेश सुविधा, स्वतंत्र रांगेची सुविधा, मानक चिन्हे आणि साइन बोर्ड असतील. तसेच मतदान केंद्रावर स्वयंसेवक सहाय्य उपलब्ध असणार आहे. अंध मतदारांकरीता ब्रेल लिपीतील मतदार स्लीप, अल्पदृष्टी मतदारांकरीता मॅग्नीफ्फाईन ग्लास व डमी मतदान पत्र आदी साहित्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

मतदार संघात दिव्यांग मतदारांसाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची सुध्दा नियुक्ती करण्यात आली आहे.

दिव्यांगांनी मतदान करण्यासाठी "सक्षम अप' द्वारे नोंदणी करून मागणी केल्यास वाहन, व्हीलचेअर, स्वयंसेवकची सोय सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पासून दिव्यांग व ८५ वर्षावरील मतदारांना गृहभेटीव्दारे टपाली मतदान करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# बैलगाडीवर बसून उमेदवारी दाखल करण्यासाठी पोहोचले नाना पटोले!



**भंडारा**–महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दाखल झाले. उमेदवारी दाखल केल्यानंतर ते म्हणाले, येथील लोकांमध्ये उत्साह पाहायला मिळतो. विरोधकांना जनता प्रत्युत्तर देईल. महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकार शेतकरी, गरीब, महिला आणि आरक्षणाच्या विरोधात आहे. महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन निश्चित आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू. महिलांची सुरक्षा ही आमची प्राथमिकता आहे. तरुणांना रोजगार देणे आणि महागाई कमी करणे हे आपले कर्तव्य आहे.

गरिबांना हक्काची जमीन देण्यापेक्षा भ्रष्ट भाजपा सरकारने अदानी, अंबानीला जमीन देण्यास प्राधान्य दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान संपवण्याचे काम भाजपा सरकार करत आहे. राज्यात शासकीय व निमशासकीय कर्माचाऱ्यांची भरती आता ठेकेदारी पद्धतीने सुरु करून मागासवर्गीयांचे नोकऱ्यातील आरक्षण संपवले जात आहे. श्रीमंतापेक्षा गरिबांना जास्त कर द्यावा लागतो, हे सर्व पाप भाजपा सरकारचे आहे. महाभ्रष्ट भाजपायुती सरकारला सत्तेतून खाली खेचणे हेच महाविकास आघाडीचे ध्येय आहे,अशी टीका कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

**काय म्हणाले नाना पटोले?**

याबाबत त्यांनी सोशल मीडिया साईटवर लिहिले की, नागरिक सहभागी झाले आहेत.शाहू–फुले–आंबेडकरांचा वारसा जपण्यासाठी मी आणि महाविकास आघाडी कटिबद्ध आहोत, चला लढूया, महाराष्ट्र घडवूया.नाना पटोले हे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी बैलगाडीतून आले होते.यावेळी त्यांच्या नामांकन रॅलीत मोठ्या संख्येने लोक पोहोचले.खासदार प्रशांत पडोळे,जिल्हा परिषदेचे पदाधिकारी,पंचायत समितीचे पदाधिकारी यांच्यासह भंडारा–गोंदिया जिल्ह्यातील कॉंग्रेस,शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दिपावली

आवक पाहून खर्च करा व येणारी दिवाळी साजरी करा.घर, अंगण,परिसर स्वच्छ ठेवा आणि स्वतःचे मनसुद्धा शुद्ध ठेवा, इतरांप्रती या काळात अमंगळ विचार मनात आणू नका. दिवाळीच्या दिवसात राग, लोभ, मत्सर,द्वेष या विकारांपासून दूर राहा. येणारी दिवाळी आनंदाने साजरी करा.दिवाळीच्या दिवसात उत्साहाने प्रत्येक दिवस,मनातली मरगळ टाकून साजरा करा.आनंदी राहा,प्रत्येक दिवसांचे महत्त्व जाणून दिवाळी साजरी करा. जिथे स्वच्छता असते तिथे लक्ष्मीचा निवास असतो. जिथे शांतता आणि समाधान असते तिथे लक्ष्मी नांदत असते.कलह,द्वेष, एकमेकांप्रती मत्सर व ज्या घरात नेहमी भांडण तंटे असतात.त्या घरातून लक्ष्मी निघून जाते. म्हणून घरातील वातावरण नेहमी प्रसन्न असावे.घरात कलह नसावे,तीव्र मतभेद नसावेत. तेव्हा लक्ष्मीदेवीच्या प्रसन्नतेसाठी घरात शांतता नांदत राहील याची काळजी घ्यावी.

संपूर्ण दिवाळीचे दिवस आनंदात घालवावे.आपल्या कुटुंबासोबत परिवारासोबत सर्व मतभेद व मनभेद विसरून राहावे.

हानिकारक फटाक्यापासून स्वतः व आपल्या मुलांना दूर ठेवावे. प्रदूषणयुक्त फटाके वर्ज्य करावे. विद्युत रोषणाईसाठी योग्य साधने वापरावी अपघातास निमंत्रण देतील अशी विद्युत उपकरणे वापरू नये. या काळात गोरगरिबांना, अपंगांना आणि अनाथाश्रमातील व्यक्तीबरोबर, वृद्धाश्रमातील वृद्धांना शक्य होईल तेवढी मदत करावी. आपल्या घरी बनवलेल्या मिष्टान्नाचे दोन घास त्यांनासुद्धा भरवावे.

या काळात कुटुंबातील कोणत्याही सदस्याचे मन दुखावेल असे वर्तन करू नये. थोरामोठ्यांचा अपमान करू नये. कठोर शब्दाचा वापर टाळावा, गृहलक्ष्मीचा अपमान करू नये. तिला मारहाण करू नये.अथवा तिला शिवीगाळ करून तिचा मानभंग करू नये.उगाचच मुलाबाळांनवर रागावू नये. घरातील प्रत्येक सभासदांशी प्रेमाने वागावे आणि व्यसनाधीन राहू नये.या काळात या दिवाळीच्या दिवसांत अनेकजण नवीन वस्तूंची खरेदी करतात. कुणी घर घेतो,कुणी प्लॉट घेतो, कुणी टीव्ही तर कुणी टुव्हीलर, फ्फोरव्हीलर आणि कुणी सोनेचांदी खरेदी करतो.ज्यांच्या जवळ मुबलक धन आहे त्यांनी खरेदी करावी पण ज्याचेजवळ धन नाही त्यांनी इर्षेपोटी कर्जबाजारी होऊन खरेदी करू नये. उधारित खरेदीची हौस भागवू नये आणि कर्जाचा डोंगर वाढवू नये,आहे त्या परिस्थितीनुसार वागावे. घरातील सभासदांचे अनाठायी हट्ट पुरवितांना आपल्या आर्थिक परिस्थितीकडे पाहून निर्णय घ्यावे.दिवाळी सण दरवर्षी येतो आणि जातो.तो आनंदाने आपल्या आर्थिक क्षमतेनुसार साजरा करावा.कुणी हत्ती आणला म्हणून कर्जबाजारी होऊन आपणही तो आणला पाहिजे.असा आततायीपणा करू नका.दुस?्यांचे सुख पाहून त्यात आनंद माना.त्यांचा मत्सर करू नका.एकदिवस आपणासुद्धा सुबत्तेचे दिवस येतील,ही आशा मनात बाळगा, समाधानी राहा.तेव्हा मंडळींनो, लागा दिवाळी सण साजरा करण्याच्या तयारीला.घरांच्या स्वच्छतेपासून सुरुवात करा. घराला रंगरंगोटी करा.परिस्थिती नुसार सण साजरा करून आनंद मिळवा. बच्चे कंपनीच्या उपक्रमात सामील व्हा आणि विशेष म्हणजे कोणत्याच प्रकारचे व्यसन न करता हा सण साजरा करा.

**दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!**

# भंडाऱ्याने राज्याला दिले पहिले उपमुख्यमंत्री



नाशिकराव तिरपुडे | विलास श्रृंगारपवार | नाना पंचबुद्धे | परिणय फुके | नाना पटोले | बंडूभाऊ सावरबांधे

**भंडारा:-** महाराष्ट्राच्या राजकीय पलटावर भंडारा जिल्ह्यायाला मंत्रीपदाच्या बाबतीत गत ६० वर्षात उपेक्षा सहन करावी लागली. दरम्यान महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री नाशिकराव तिरपुडे हे भंडारा येथील गणेशपूरचे निवासी होते. ही जिल्ह्यासाठी उल्लेखनीय बाब आहे. त्यानंतर जिल्ह्यातून आतापर्यंत ४ आमदारांना राज्यमंत्री होण्याची संधी प्राप्त झाली.

१९७८ मध्ये वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना काँग्रेसचे तिरपुडे हे राज्याचे उपमुख्यमंत्री होते. विधानपरिषद सदस्य असताना जानेवारी १९७८ मध्ये राजकीय घडामोडीत त्यांनी इंदिरा गांधींना पाठिंबा दर्शविला. त्यानंतरच्या सत्यास्थापनेत त्यांना महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला होता. स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीचे ते खंदे समर्थक होते.

१९९५ मध्ये अखिल भारतीय इंदिरा काँग्रेस स्थापनेत त्यांचा महत्वाचा वाटा होता. ते कार्यकारी समिती केंद्रीय संसदीय मंडळाचे सदस्य आणि महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते.

यांचीही लागली लॉटरी जिल्हा परिषद सदस्य ते जि.प.चे अध्यक्षपद भूषविणाऱ्या बंडूभाऊ सावरबांधे यांनासुद्धा १९९९ मध्ये राज्यमंत्रीपत्र मिळाले होते.

### श्रृंगारपवार होते पहिले राज्यमंत्री

**भंडारा जिल्ह्यातून पहिले राज्यमंत्री होण्याचा मान अड्याळचे आ. विलास श्रृंगारपवार यांच्या वाट्याला आला. १९९० मध्ये ते अपक्ष आमदार असताना १९९४-६५ मधील राजकीय घडामोडीत मुख्यमंत्री शरद पवार यांना सत्ता टिकवून ठेवण्यासाठी ११ आमदारांची गरज होती. यावेळी कुठलीही अपेक्षा नसताना या सरकारमध्ये त्यांना शिक्षण राज्यमंत्रीपद बहाल करण्यात आले.**

पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आल्यानंतरही राज्यमंत्री होण्याची संधी नाना पंचबुद्धे यांना मिळाली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत विधानपरिषद सदस्य डॉ. परिणय फुके यांनी काँग्रेसचे नाना पटोले यांना जोरदार टक्कर दिली. अटीतटीच्या लढतीत फुके यांना पराभव झाला. मात्र देवेंद्र फडणवीस यांचया जवळचे असल्याने भंडरा-गोदिया जिल्ह्यावर भाजपची पकड ठेवण्यासाठी त्यांना राज्यमंत्रीपदासह भंडाऱ्याचा पालकमंत्रीपदाचीही जबाबदारी सोपविण्यात आली होती.


सध्या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ.नाना पटोले यांना एकदाही मंत्री होता आले नाही. दरम्यान २०१९ मध्ये सत्तास्थानेनंतर त्यांना विधानसभेचे अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. ही जिल्ह्यासाठी मोठी उपलब्धी म्हणता येईल.

# गेल्या निवडणुकीत ४७ उमेदवार उतरले मैदानात; तब्बल २६ उमेदवारांची मजल हजाराच्या आतच !

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु झाला आहे. यामध्ये लढती कशा होणार, कोण-कोण आमने-सामने येणार हे अद्यापही अस्पष्ट असून उमेदवारीकडे इच्छुकांसह मतदारांचेही लक्ष लागले आहे. या निवडणुकीत दरवर्षीच काही हौसेगवसेही नशीब आजमावून पाहतात.

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये चारही विधानसभा क्षेत्रातून ४७ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी तब्बल २६ उमेदवारांना साधा हजार मतांचाही पल्ला गाठता आला नाही. यावेळीदेखील वेगळी परिस्थिती नसणार आहे. कारण, अनेक जण निवडणूक लढविण्यासाठी दंड थोपटून तयार आहेत. त्यामुळे मातब्बर नेत्यांसमोर त्यांचा कितपत टिकाव लागतो हे येणारी वेळच सांगणार आहे.

**विधानसभेचा रणसंग्राम : गोंदिया विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक १८ उमेदवारांनी लढविली निवडणूक**




**२०१९ च्या निकालाचे मतदार संघनिहाय असे होते चित्र**

| मतदार संघ | अर्जुनी मोरगाव | तिरोडा | गोंदिया | आमगाव |
|---|---|---|---|---|
| एकूण उमेदवार | ८ | १२ | १८ | ९ |
| १ हजारापेक्षा कमी मते | ४ | ७ | ११ | ३ |
| १ हजारापेक्षा कमी मते | १ | २ | ३ | ३ |
| ५००१ ते १०,००० मते | ०० | ०० | २ | ०० |

# वेग मर्यादा ११० असताना वाहनांची मर्यादा २५० का?

## वेग मर्यादित ठेवणे आवश्यक, लवकर निघा, हळू चालवा व सुखरुप पोहोचा



### वाहनांची वेय मर्यादा जास्त कशासाठी?

**वाहन तयार करणाऱ्या कंपन्यानीच वाहनांना दिलेली वेग मर्यादा ही खूप अधिक असताना आता जास्त वेग मर्यादा देणे अत्यंत धोक्याचे आहे. अविचाराने जास्य वेगात वाहने चालविल्यास ते दुसऱ्यांचा जीव घेतील. रस्त्याने जाणाऱ्या निष्पाप व्यक्तीच जीव घेणे ही खुनापेक्षाही गंभीर वाटते.**

### वेगमर्यादा ओलांडली, महिन्यात लाखाचा दंड वसूल

**महमार्ग हे प्रवासास सुखकारक असले, तरी दिलेल्या वेग मर्यादित वाहन चालविणे आवश्यक आहे. मात्र, अनेकदा दिलेल्या वेग मर्यादपेक्षा वाहनाचा वेग ठेवून चालक वाहने चालवित असतात. महामार्गावर वेग मोजण्यासाठी स्पीड गन ही लावण्यात आली आहे. महिन्याभरात साधारण लाख रुपयांचा दंड हा भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहकाकडून वसूल केला जातो.**

**गोंदिया:** महामार्गावर वाहन चालविण्याची वेग मर्यादा ८० ते १२० दरम्यान असते. मात्र, वाहन कंपन्याकडून वाहनांची वेग मर्यादा २५० पर्यंत दिलेली असते. मात्र नियमानुसार दिलेल्या वेग मर्यादेनुसार वाहन चालविणे गरजेचे असताना वाहने १५० च्या वेगाने पळविली जातात.

त्यामुळे अपघातालाही आमंत्रण दिले जाते. महामार्गावरील वेग मर्यादा मर्यादित असताना वाहन कंपन्यांनीही वेग मर्यादा मर्यादीत ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन अपघात टाळण्यास मदत होऊ शकते.

वाहतुकीचे नियम तोडले की अपघात होतात व यामध्ये कित्येकांच्या जिवावर बेतते. लवकर निघा, हळू चालवा व सुखरुप पोहोचा हा वाहतुकीचा मंत्र असतानाही त्याचे पालन केले जात नाही. घरी जाण्याची भलतीच घाई त्यांच्या जीवावर बेतते. नियम तोडले की अपघात घडतात असे असतानाच दारु पिवून वाहन चालविल्याने नियम तुटत असून अपघात घडत आहेत. बहुतांश अपघातांमध्ये चालक मद्यप्राशन केलेला आढळून येतो.

मात्र, मद्य प्राशन करुन वाहन भरधाव वेगात चालविले जाते. पुढे हाच प्रकार जिवावर बेततो. यामुळेच दारु पिरून वाहन चालवू नये, असे सांगितले जाते.

### हेल्मेट, सीट बेल्ट विसरु नका

**बहुतांश अपघातात डोक्याला मार लागूनच व्यक्तीचा जीव जातो. यासाठीच वाहन चालविताना दुचाकीचालकांनी हेल्मेट लावले पाहिजे. तसेच भरधाव वेगात वाहन चालवू नये.**

### जिल्ह्यात सर्वाधिक वेगमर्यादा ११०

**जिल्ह्यात सर्वाधिक वेग ११० आहे. जास्त वेगाची वाहने असली तरी त्यांनी जोरात वाहने चालवू नयेत. अन्यथा अपघात होण्याची शक्यता आहे. त्यातच गोंदियातील रस्ते खड्ड्यात असल्याने वाहन जोराने चालविल्यास कधी अपघात होईल सांगता येत नाही.**

**वाहनांची स्पीड बांधून द्यावी म्हणजेच ते वाहन जास्त भरधाव वेगात चालविता येणार नाही. कमी वेगाची वाहने जर बाजारात आली तर जास्त वेगात वाहन चालविण्याचा प्रयत्न उरत नाही.**

**दिनेश चिंचाळकर, ऑटोमोबाईल तज्ज्ञ**

**वाहन चालविताना प्रत्येकाने नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. नियम तुटले की, अपघात घडतात व कित्येकदा जिवावर बेतते. यामुळे नियम पाळा, कारण, प्रत्येकाची वाघ बघणारे घरी आहेत.**

**किशोर पर्वते, पोलीस निरीक्षक गोंदिया शहर**

# अग्रवाल व रहांगडाले यांच्या संपत्तीत झाली वाढ

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु झाला असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच गुरुवारी (दि.२४) गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आ. विनोद अग्रवाल व तिरोडा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार विजय रहांगडाले यांनी मूहूर्ताचा उमेदवारी अर्ज दाखल केला. यामध्ये दिलेल्या माहितीनुसार या दोघांच्या संपत्तीत मागील निवडणुकीच्या तुलनेत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे हे दोघे उमेदवार कोट्याधीश असल्याचे त्यांच्या प्रतिज्ञापत्रातून उघड होते.

विधानसभा निवडणूक अंतर्गत उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. गुरुवारी (दि.२४) गुरुपुष्य योग होता व याला शुभ मानले जात असल्याने कित्येक उमेदवारांनी मुहूर्ताचा अर्ज म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यात विद्यमान आमदारांमध्ये आ. अग्रवाल तसेच तिरोडा विधानसभ मतदारसंघाचे आ. रहांगडाले यांचा समावेश आहे. यातील आामदार अग्रवाल यांनी अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार सन २०१९ मधील निवडणुकीत त्यांनी जंगम मालमत्ता एक कोटी १२ लाख ७० हजार ९३० एवढी



नोंद केली होती. मात्र आताच्या अर्जात त्यांनी जंगम मालमत्ता एक कोटी ४६ लाख ३४ हजार ४०५ एवढी नोंद केली आहे. पाच वर्षात यामध्ये ३३ लाख ६४ हजार २७५ रुपयांची वाढ झाली आहे.

आ.रहांगडाले यांनी सन २०१९ मध्ये दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी तीन कोटी २५ लाख ७३ हजार ५०१ एवढी जंगम मालमत्ता नोंद केली होती. तर आता त्यांनी जंगम मालमत्ता चार कोटी ४३ लाख नऊ हजार ७१२ एवढी नोंद केली आहे. यामध्ये एक कोटी १७ लाख ३६ हजार २११ रुपयांची वाढ झाली आहे.

### विजुभाऊंना आहे वाहनांचा शौक

**आमदार रहांगडाले यांच्याकडे आजघडीला १९ लाख ९३ हजार ५३८ रुपये किमतीची डस्टर, २४ लाख २५ हजार ४१२ रुपये किमतीची फॉर्च्यूनर, दीड लाख रुपते किमतची बुलेट तसेच दोन जेसीबी व दोन ट्रक आहेत. तर आमदार अग्रवाल यांच्याकडे फक्त एकच फॉर्च्यूनर कार असून तिची किमत ३७ लाख ४४ हजार ९४४ रुपये आहे. यावरुन आमदार रहांगडाले यांना वाहनांचा शौक दिसून येतो असे म्हणणे वागवे ठरणार आहे.**

### अग्रवाल यांच्याकडे चार, तर रहांगडाले यांच्याकडे आठ लाखांचे सोने

**आमदार अग्रवाल यांच्या प्रतिज्ञापत्रानुसार त्यांच्याकडे सध्या चार लाख रुपये किमतीचे ५० ग्रॅम सोने आहे. तर आमदार रहांमडाले यांच्याकडे १० तोळे सोने असून त्याची किंमत आठ लाख पये नोंदलिी आहे.**

# निवडणूक कालावधीत ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध

**गोंदिया :** भारत निवडणूक आयोगामार्फ्रत महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. गोंदिया जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक निकालांचे अंदाज १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजेपासून ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत



कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे.

त्याचप्रमाणे मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल) अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असेही निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

# विधानसभेसाठी १९० चिन्हे जाहीर, कोटापासून बुटापर्यंतचा समावेश

## जेवणाच ताट, आइसक्रीमसह अन्य कित्येक मजेशीर चिन्हांची पंगत

**गोंदिया:** हिरवी मिरची, नरसाळे, झगा, पॅन्ट, फणस, प्लॉवर, कोल्हापुरी पायताण, उड्या मारण्याची दोरी, कॅरम,स्वीच बोर्ड, लोकर व सुई, पक्कड, ड्रील मशीन आहो, तुम्हाला ही घरातील साहित्याची यादी वाटत असेल तर जरा थांबा. या दैनंदिन गरजेच्या वस्तू कितीही महाग झाल्या असल्या तरी निवडणूक आयोगाने मात्र विधानसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारांवर चिन्हांच्या रुपाने मुक्तहस्ताने उधळण केली आहे. यातील काही चिन्हे पारंपरिक, काही बदलत्या काळाला अनुसरुन तर काही अगदीच मजेशीर अशीच आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवारी अधिसूचना जाहीर झाली. त्यानंतर निवडणूक विभागाने विधानसभा मतदारसंघासाठी अर्ज भरण्यात येणाऱ्या कार्यालयाबाहेर राष्ट्रीय पक्षांचे राखीव चिन्ह व अपक्ष उमेदवारांसाठीच्या मुक्त चिन्हांची मोठी यादीच लावली आहे. यातील बरीचशी चिन्हे मजेशीर आहेत. काही चिन्हे अशी आहेत की, ती मिळालेल्या उमेदवाराची प्रचार करताना कसरत होणार आहे. ती चिन्हे पाहत अनेक जण त्या ठिकाणी थांबून उत्सुकतेने पाहताना दिसतात. तसेच त्यावर चर्चा करताना दिसत आहेत.

### अशी आहेत चिन्हे

**फळे व भाज्या-** सफरचंद, फणस, अक्रोड, कलिंगड,फ्लॉवर, सिमला मिरची, हिरवी मिरची, फळांची टोपली, मटर, भूईमूग, केक, द्राक्षे, चॉकलेट, आले, भेडी, पाव.

**दागिने-कपडे-** कानातले, नेकलेस, बांगड्या, अंगठी, कोट, बुट, कोल्हापुरी चप्पल, बेल्ट आदी.

**अन्य साहित्य-**दाढी करण्याचे ब्लेड, पंचिंम मशीन, स्वीच बोर्ड, खिडकी, कपडे अडविण्यासाठी भितीची पट्टी, स्कूल बॅग, उशी, किचरमधील सिंक, करवत, हातगाडी, विटा, खाट.

**घरातील साहित्य-** कचरापेटी, जेवणाचा डब्बा, सेफ्टी पिन, नेल कटर, टूथपेस्ट, ब्रश, काठी, पेट्रोलपंप, पाणी गरम करायचे रॉड, लायटर, कडी, पेन स्टॅण्ड, टाय, नुडल्सचे वाडगे, दरवाजाची कडी, फ्रीज, टी.व्ही., लॅपटॉप, मशीन, जात, पोळपाट- लाटण, टोस्टर, वॉशिंग मशीन.

# काँग्रेस नेते राजेश नंदागवळी व अजय लांजेवार यांची काँग्रेसमधून हकालपट्टी

**गोंदिया:-** राज्यात सध्या विधानसभा निवडणूकीचे वारे वाहत असून महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाने अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड यांना उमेदवारी जाहीर केली. त्या उमेदवारी विरोधात पक्षविरोधी कारवाई करीत पक्षशिस्त मोडल्याबद्दल काँग्रेसचे नेते व माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती राजेश नंदागवळी व नुकतेच



काँग्रेसमध्ये आलेले अजय लांजेवार यांचे काँग्रेस पक्षातून ६ वर्षाकरीता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशावरुन निष्काषन करण्यात आले आहे. प्रदेश काँग्रेसचे प्रशासन व संघटन उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी यासंदर्भात पत्र काढले आहे.

# मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे मतदानासाठी ग्राह्य-जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते

**भंडारा :** मतदानासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र (एझखउ) व्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येईल, अशी माहिती, जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.संजय कोलते यांनी दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी श्री. कोलते यांनी ही माहिती दिली. ज्यांच्याकडे मतदार ओळखपत्र आहे, असे मतदार मतदान केंद्रावर आपली ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करतील. मतदार ओळखपत्र नसणा?या मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळख पत्र.

संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र असे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

# यू-डायसमध्ये पुन्हा गोंदिया राज्यात ठरला अव्वल

## जिल्ह्यात १६६४ शाळांची माहिती प्रणालीवर अपलोड: इतर जिल्ह्यांसाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत

**गोंदिया:** जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली केंद्र सरकारमार्फत ऑनलाइन कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या सर्व व्यवस्थापनाच्य माध्यमांच्या राज्य बोर्ड, सीबीएससी, आयजीसीएलसी आदि अनाधिकृर मान्यता नसलेल्या शाळांची माहिती संकलित करुन संगणीकृत करण्यात येते.

जिल्ह्यात १६६४ शाळा असून त्या सर्व शाळांनी माहिती प्रणालीवर अपलोड केली आहे. सर्व शाळांनी माहिती भरुन गोंदिया राज्यात अव्वल स्थानावर असल्याचे संगणक प्रोग्रामर नितेश खंडेलवाल यांनी सांगितले आहे.

### काय आहे यू डायस प्लस?

**राज्य शासनाकडून विविध योजना राबविताना अनुदान वाटप करण्यात येते. या योजना राबविणे, अनुदान वाटप करणे, त्यांचे नियोजन व्यवस्थित करता यावे, यासाठी शाळांची सविस्तर माहिती एकत्रित उपलब्ध व्हावी, यासाठी यू डायर प्लस प्रणाली विकसित करण्यात आली आहे.**

### १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी व समग्र शिक्षा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता ही प्रणाली महत्वाची आहे.**

**राज्यातील फक्त गोंदिया व गडचिरोली या दोनच जिल्ह्यांची १०० टक्के माहिती अपलोड झाली. इतर जिल्ह्यांची माहिती अपुरी असल्याने त्यांच्यासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.**

### राज्यात गोंदिया अव्वल

**सर्व शाळांचा तपशील, विद्यार्थी संख्या, दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, शिक्षक प्रशिक्षण, शाळा अनुदान आदींची माहिती अपलोड केली आहे.**

### शंभर टक्के माहिती अपलोड

**शासनाने यू-डायसची माहिती अपलोड करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिली होती. यात गोंदिया जिल्ह्याने ३० सप्टेंबरच्या आत माहिती अपलोड करुन राज्यात प्रथम क्रमांकावर माहिती देण्यात जिल्हा नेहमी अग्रेसर असतो?**

**नियोजनासाठी प्रणाली विकसीत गुरुजींनी दिलेली आणि अंतिम केलेली माहिती संगणकीकृत करण्यात आली आहे. ही माहिती जिल्हास्तरावरुन शिक्षणाधिकारी जिल्हा परिषदेमार्फत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयात सादर करण्यात येते. शासन पातळीवरुन अनुदान वाटप, नियोजन व्यवस्थित करण्यासाठी ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.**


**सुधीर महामुनी, प्राथमिक शिक्षणाधिकारी गोंदिया**

# सुरक्षित दिवाळी साजरी करीत सणाचा आनंद व्दिगुणित करा

**नागपूर: -** प्रकाशपर्व अर्थातच दिवाळसणाला काही दिवस शिल्लक असून तयारीची लगबग सुरु झाली आहे. सर्वत्र नवचैतन्याचे वातावरण आहे, दिवाळीचा आनंद अधिक व्दिगुणित करण्यासाठी सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले असून, समस्त वीज ग्राहकांना, कर्मचाऱ्यांना आणि हितचिंतकांना दिवाळी सणाच्या शुभेच्छा देखील त्यांनी दिल्या आहेत.

दिवाळति होणाऱ्या रोषणाई मुळे वीज यंत्रणेवर ताण पडतो अश्यावेळी वीजेचा गरजेनुसार वापर करण्यात यावा. बाजारात कमी वीज लागनारे एलईडी दिवे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत, त्यांचा वापर करून वीजवापर नियंत्रीत ठेवा. दिवाळीत होणारी सजावट, विद्युत रोषणाई आणि आतिषबाजी यामुळे दुर्दैवी घटना व्हायला एक कारण पुरेसे असते, अश्या घटनांनी आनंदावर विरजण पडायला वेळ लागत नसल्याने अश्या दुर्दैवी घटना टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी, दिवाळीच्या दिवशी फटाक्याने लागलेल्या आगीच्या घटना दरवर्षीच मोठ्या संख्येने होत असतात, यात केवळ वित्त हानीच नव्हे तर जिवीत हानीही मोठ्या प्रमाणात होत असते. सुरक्षिततेची खबरदारी न घेता, निष्काळजीपणा आणि उदासिनता यामुळे अश्या घटना होत असतात. आपल्या व आपल्या कुटुंबियांचा दिवाळीचा आनंद व्दिगुणित करण्यासाठी महावितरणने काही खबरदारीचे उपाय सुचविले असून त्यावर अंमलबजावणी करण्याचे आवाहनही मुख्य अभियंता यांनी केले आहे.

दिवाळी आणि दिवे यांचे एक अतूट नाते आहे, त्यामुळे दिव्यांनी घराची सजावट करतांना ती



मोकळ्या जागेत लावावी. पडदे, बिछाना यापासून ते लांब असतील याची काळजी घ्यावी. लहान मुले आणि पाळीव प्राण्यांपासून दिवे दुर आणि उंचीवर तसेच पंखे, वीजतारा यापासूनही ते दुर ठेवावेत. उच्च दर्जाच्या दिव्यांच्या माळा चा वापर करावा, तुटलेल्या वीज तारा वापरु नये किंवा जोड देतांना योग्य दर्जाच्या इन्सुलेशन टेपने त्या सुरक्षित करुन घ्यावेत, तुटलेले सॉकेट्स वापरू नये, घरात कुणीही नसतांना सर्व विद्युत उपकरणे बंद करावीत. फ़टाके उडविल्यानंतर त्याचा होणारा कचरा वीज यंत्रणेजवळ फ़ेकू नका, त्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावा, येणाऱ्या प्रकाश उत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी ग्राहकांना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा व्हावा म्हणून वीज वाहिन्या व वीज उपकरणांची देखभाल व दुरुस्तीची कामे तातडीने पुर्ण करण्याच्या सुचना सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केल्या असल्याचेही दिलीप दोडके यांनी सांगितले.

दिवाळसणात मोठ्या प्रमाणात जनतेचा सहभाग असल्याने सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारे वीज अपघात होणार नाही यासाठी बाजारपेठ परिसरातील कर्मचाऱ्यांनी दक्ष राहून योग्य त्या उपाययोजना करणे, या काळात वीजपुरवठा अखंडित राहील यासाठी विभागिय अधिकारी, उपविभागिय अधिकारी व शाखा अधिकारी यांनी दिवाळी पुर्ण होईपर्यंत स्वत: जातीने उपस्थित राहण्यासोबतच या संपुर्ण प्रकाशपर्वादरम्यान सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

### हे लक्षात असू द्या :-

- **रोषणाईसाठी कमी वॅटच्या एलईडी दिव्यांचा वापर करा.**
- **विद्युत सॉकेट्सवर अधिक भार टाकू नये.**
- **रोषणाईसाठी वापरण्यात येणारे विद्युत दिवे त्यांच्या तारा व सॉकेट्स तपासून घ्याव्यात.**
- **वीज तारा जवळ फ़्रटाके उडवू नये.**
- **विजेच्या उपकरणांजवळ फ़्रटाके ठेवू नये.**
- **फटाके उडवताना मोकळ्या जागेत उडवावी.**
- **फटाक्यांची आतिषबाजी करतांना आवश्यक त्या सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात.**
- **फटाक्यांचा कचरा वीज यंत्रणेजवळ फ़ेकू नका.**
- **उपाययोजना कराव्यात.**
- **फटाक्यांचा कचरा वीज यंत्रणेजवळ फ़ेकू नका.**

# बडोले,रहांगडाले,पुराम,बन्सोड यांचे शक्तिप्रदर्शनाने उमेदवारी अर्ज दाखल





**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आता अंतीम टप्प्यात आहे. सोमवारी (दि.२९) महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातर्फे राजकुमार बडोले, भाजपकडून विजय रहांगडाले, संजय पुराम तर महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाकडून दिलीप बन्सोड यांनी पक्षाच्या एबी फॉर्मसह जोरदार शक्तिप्रदर्शनासह उमेदवारी अर्ज दाखल केला. मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे काही प्रमुख पक्षाच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे नियोजन केले आहे.

२० नोव्हेंबरला होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास प्रारंभ झाला. शनिवारी व रविवारी सलग सुटी असल्याने हे प्रक्रिया बंद होती. २९ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख होती. सोमवारी जिल्ह्यातील चारही मतदारसंघातून प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी पक्षाच्या एबी फॉर्मसह उमेदवारी अर्ज दाखल केले. अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातर्फे राजकुमार बडोले यांनी शक्तिप्रदर्शनासह खा. प्रफुल पटेल, मध्यप्रदेशचे माजी गृहमंत्री नरोतम मिश्रा व महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

तिरोडा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार आ. विजय रहांगडाले यांनी तर आमगाव मतदारसंघातून भाजपचे माजी आ. संजय पुराम यांनी पक्षाच्या एबी फॉर्मसह उमेदवारी अर्ज दाखल केला.

महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षातर्फे अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून मायी आ. दिलीप बन्सोड यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खा. प्रशांत पडोळे यांच्या उपस्थितीत पक्षाच्या एबी फॉर्मसह उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सोमवारी प्रमुख पक्षाच्या उमेदवारांसह एकूण ५० जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. तर काही प्रमुख उमेदवारांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी शक्तिप्रदर्शासह उमेदवारी अर्ज दाखल केल्याचे बघावयास मिळाले.



## तिरोडा मतदारसंघातून वंचितकडून अतुल गजभिये यांना उमेदवारी

**वंचित बहुजन आघाडीतर्फे रविवारी (दि. २७) आणखी काही उमेदवारांच यादी जाहीर झाली. त्यात तिरोडा मतदारसंघातून अतुल गजभिये व युवा उमेदवाराला उमेदवारी जाहीर केली. वंचितने आतापार्यंत जिल्ह्यातील अर्जुनी मोरगार आणि तिरोडा या दोन मतदारसंघातील उमेदवार जाहीर केले आहेत.दोन्ही मतदारसंघातील उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.अतुल गजभिये यांनी तिरोडा गोरेगाव मतदारसंघाकरीता आज रॅली काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.**

# तिन्ही माजी आमदार आहेत कोट्यधीश

## अर्ज दाखल करुन उतरले रिंगणात, कुणाच्या संपत्तीत वाढ, तर कुणाच्या संपत्तीत घट

**गोंदिया:** महायुती व महाविकास आघाडीने आपले उमेदवार आता जाहीर केले असून सोमवारी (दि.२८) प्रमुख पक्षाच्या उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यात माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आ.संजय पुराम, व दिलीप बन्सोङ यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यांच्या प्रतिज्ञाप्रतानुसार ते तिघेही कोट्याधीश आहेत.यात कुणाची स्थावर, तर कुणाची जंगम संपत्ती, कमी–जास्त झाल्याचे आढळते.





तिन्ही प्रमुख उमेदवारांच्या जोडलेल्या प्रतिज्ञाप्रत्रानुसार मालमत्तेवर नजर टाकली असता राजकुमार बडोले यांनी वर्ष २०१९ मध्ये ५७ लाख ९४ हजार ९२५ रुपयांची जंगम संपत्ती दर्शविली होती. तर आता ५२ लाख ७० हजार ३२६ रुपयांची जंगम संपत्ती दर्शविली आहे. म्हणजेच त्यात पाच लाख २४ हजार ५९९ रुपयांची घट आली आहे. तर २०१९ मध्ये स्थावर संपत्ती ५९ लाख ६४ हजार रुपये दर्शविली होती. आता २०२४ मध्ये दोन कोटी २१ लाख रुपयांची संपत्ती दर्शविली आहे. म्हणजेच त्यात एक कोटी ६१ लाख ३६ हजार रुपयांची वाढ झाली आहे. दिलीप बन्सोड यांनी २०१९ मध्ये १५ लाख ७३ हजार ९२५ रुपयांची जंगम संपत्ती दर्शविली होती. तर आता ७० लाख ३६ हजार ५५४ रुपयांची जंगम संपत्ती दर्शविली आहे. म्हणजेच त्यात ५४ लाख ६२ हजार ६२९ रुपयांची वाढ झाली आहे. शिवाय २०१९ मध्ये त्यांनी एक कोटी सहा लाख रुपयांची स्थावर संपत्ती दर्शविली होती. तर आता एक कोटी ३८ लाख १५ हजार रुपये दर्शविली आहे. म्हणजेच यामध्ये ३२ लाख १५ हजार रुपयांची वाढ झाली आहे. तसेच संजय पुराम यांनी २०१९ मध्ये ५० लाख ८० हजार ४८३ रुपयांची जंगम संपत्ती दर्शविली होती. आता त्यांनी ५६ लाख १० हजार ९४७ रुपयांची जंगम संपत्ती दर्शविली आहे. म्हणजेच यामध्ये पाच लाख ३० हजार ४६४ रुपयांची वाढ झाली आहे. तसेच २०१९ मध्ये त्यांनी ५२ लाख रुपयांची स्थावर संपत्ती दर्शविली होती. तर आता ४२ लाख रुपयांची स्थावर स्थावर संपत्ती दर्शविली आहे.म्हणजेच त्यामध्ये १० लाख रुपयांची घट झाली आहे.

### बन्सोड यांना आहे वाहनाचा छंद

**प्रतिज्ञापत्रातील माहितीनुसार, माजी आमदार बन्सोड यांच्याकडे १३ लाख १२ हजार रुपये किमतीची एक्सयूव्ही का, ४५ लाख रुपयांची फॉर्च्यूनर कार व ५८ हजार रुपये किमतीची मोटारसायकल आहे. बडोले यांच्याकडे २५ लाख रुपये किमतीची स्कॉपिओ आहे. तर पुराम यांच्याकडेही २४ लाख ५० हजार रुपये किमतीची स्कॉपिओ आहे.**

# महा निवडणूक-महारांगोळी कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व मतदारांनी सहर्ष सहभाग नोंदवा

## जिल्हाधिकारी प्रजित नायर यांचे मतदारांना आवाहन

**गोंदिया :** भारत देशा–तील लोकशाहीच्या उत्स–वात महाराष्ट्र राज्यामध्ये यंदा लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव साजरा करण्यात येत आहे. भारत निवडणूक आयोग यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्रात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांना मतद–ानाचे कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे.

मतदार राजाला लोकशाहीने जो मतदानाचा हक्क दिला आहे तो तुम्ही व्यवस्थितपणे योग्य मतदान करून बजवावे. देशाच्या लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्त्वाचे आहे. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी गोंदिया जिल्हा प्रशासन निष्पक्ष आणि मुक्त वातावरणात निवडणुका घेण्यासाठी कटिबद्ध आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने मतदान होणार आहे. यासाठी गोंदिया जिल्ह्यात अधिकाधिक मतदान होण्याकरिता डतएएझ कार्यक्रमांतर्गत महिला मतदारांचे मतदान वाढविण्याच्या उद्देशाने महिलांनी ङ्गङ्गएक घर–एक रांगोळीफ्फ यानुसार ३ लक्ष घरात रांगोळी काढून दिवाळी सणानिमित्त मतदान जनजागृती करण्याकरीता दिनांक १ नोव्हेंबर २०२४ रोजी दिवाळीच्या दिवशी माझे मत माझा अधिकार/ मेरा मत मेरा अधिकार/ असे घोषवाक्य लिहून आपल्या घरासमोरची रांगोळी मतदान जनजागृती संबंधाने मोबाईल क्रमांक ७०२०१६३४०० यावर रांगोळी पाठवून महा निवडणूक – महारांगोळी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी प्रजित नायर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी केले आहे.



सदर कार्यक्रमास जिल्ह्या–तील जिल्हा डतएएझ उएङङ सह नोडल शिखा पिपलेवार, जिल्हा डतएएझ उएङङ सह नोडल डॉ.महेंद्र गजभिये, केदार गोटेफ्फ ेडे, सचिन धोपेकर, चंदू दमाहे, चंदू दुर्गे, संजय टेंभरे, विजय लिल्हारे, सुनैना पानतावणे तसेच जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील तालुका नोडल त्यांची टीम, सर्व उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, योजनादूत तसेच सर्वच स्तरातील कर्मचारी पर्यवेक्षक यंत्रणा म्हणून काम करणार आहेत.

# अटी, शर्ती मंजूर नसलेल्या संस्थांना वगळून होणार धान खरेदी

**गोंदिया :** धानातील तुटीच्या मुद्द्याला घेऊन जिल्ह्यातील आधारभूत धान खरेदी करणाऱ्या संस्थांनी तुटीत वाढ केल्याशिवाय धान खरेदी न करण्याचा निर्णय घेतला आहे, तर दुसरीकडे जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने ज्या संस्थांना शासनाच्या अटी, शर्ती मंजूर नाही, त्या संस्थांना वगळून धान खरेदी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे धान खरेदीचा तिढा अजून वाढण्याची शक्यता आहे.

यंदा ऑक्टोबर महिना संपत आला तरी अद्यापही शासकीय धान खरेदी केंद्र सुरू झाले नाही. आधारभूत धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे; पण यंदा नोंदणीलाच १९ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली. परिणामी आतापर्यंत केवळ पाचशे शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे धान खरेदीस सुरुवात झाली नाही.

दिवाळी असल्याने तीन–चार दिवस सुट्या आहेत. त्यामुळे ५ ऑक्टोबरनंतरच धान खरेदी केंद्र सुरू होणार आहे. दिवाळीपूर्वी धान खरेदी केंद्र सुरु न झाल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची शक्यता बळावली आहे. तर धान खरेदी केंद्र किती लवकर सुरु होतात याकडे शेतकऱ्यांची नजर आहे.

### २७८ राईस मिलर्सने केले करारनामे

**शासकीय धान खरेदी केंद्रावर धान खरेदीला सुरुवात झाल्यानंतर त्वरित धानाची उचल करून भरडाई करता यावी यासाठी सुरुवातीपासून धानाची भरडाई करण्याचे नियोजन केले आहे, यासाठी ३८० राईस मिलर्सने अर्जाची उचल केली होती. त्यापैकी २७८ राईस मिलर्सने करारनामे भरूनदेखील दिल्याची माहिती आहे. पहिल्या टप्प्यात १०० केंद्रे सुरू होणार जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने यंदा पहिल्या टप्प्यात १०० धान खरेदी केंद्रे सुरु करण्याचे नियोजन केले आहे. यासाठीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तर दुसऱ्या टप्प्यात एकूण १८५ धान खरेदी केंद्रे सुरू केली जाणार आहेत. तर आदिवासी विकास महामंडळातफर्फे ४५ केंद्रे सुरू केली जाणार आहेत.**

# महायुतीचे उमेदवार विनोद अग्रवाल यांचे अर्ज भरतेवेळी गोंदियात जोरदार शक्तिप्रदर्शन



**गोंदिया:** गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे भाजप –शिवसेना–राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष महायुतीचे उमेदवार विनोद अग्रवाल यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज गुरुवार(दि.२४)दाखल केला.

स्वागत लॉन येथून निघ–ालेली ही रॅली, गांधी प्रतिमा मार्गे गोरेलाल चौक, नेहरु चौक होत जयस्तंभ चौकात असलेल्या प्रशासकीय इमारतीसमोर पोचली. अर्ज दाखल करण्याआधी भाजप उमेदवार विनोद अग्रवाल यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केले. उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी भाजपमहायुतीचे उमेदवार विनोद अग्रवाल ,विधानपरिषद सदस्य डॉ.परिणय फुके, माजी आमदार राजेंद्र जैन, भाजप जिल्हाध्यक्ष एड. येशुलाल उपराडे उपस्थित होते.

### ३ ते १७ नोव्हेंबर पर्यंत जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**गोंदिया :** पोलीस अधीक्षक गोंदिया कार्यालयाचे पत्रानुसार जिल्ह्यात ३ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत विविध पक्ष व संघटनांकडून त्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भाने उपोषणे, धरणे, मोर्चे, रास्ता रोको, जेल भरो व संप इत्यादी आंदोलने आयोजित केली जात आहेत. तसेच ३ नोव्हेंबरला भाऊबीज, १५ नोव्हेंबर रोजी कार्तिक पौर्णिमा व गुरुनानक जयंती साजरी करण्यात येणार आहे. तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ संबंधाने आदर्श आचारसंहिता अंमलात असल्याने जिल्ह्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आदेश लाागू केले आहे.

# काँग्रेस कार्यकर्त्यांनी अडविला पटोलेंचा ताफा

**गोंदिया:–** महाविकास आघाडीकडून अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रासाठी काँग्रेसने स्थानिकांना डावलून तिरोडा विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार दिलीप बन्सोड यांना उमेदव–ारी दिल्याने संतप्त काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आज २८ ऑक्टोबर रोजी अर्जुनी मोर येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा ताफा अडवून त्यांच्याविरोधात घोषणा देत त्यांना जाब विचारला.

यावेळी नाराज शेकडो कार्यकर्त्यांनी पटोले यांच्या विरोधात घोषणा दिल्या. अर्जुनी मोर विधानसभेसाठी मविआकडून



काँग्रेसचे उमेदवार दिलीप बन्स–ोड यांचे उमेदवारी अर्जदाखल करण्यासाठी नाना पटोले आज सोमवारी अर्जुनी येथे दाखल झाले. तिरोडा येथून पार्सल पाठवून स्थानिक उमेदवारांवर अन्याय केल्याची भावना व्यक्त केली. दरम्यान पक्ष विरोधी कार्य करीत असल्याची माहिती पक्षाच्या प्रदेश कार्यालयाला प्राप्त झाली असून डॉ. अजय लांजेवार व राजेश नंदागवळी यांना काँग्रेस पक्षातून सहा वर्षासाठी निलंबित केल्याची माहिती दिली. त्यामुळे कार्यकर्ते आणखी संतप्त झाले. स्थानिक इच्छुकांची व कार्यकर्त्यांची चूक काय? असा प्रश्न केला. यावर पटोलेंनी आपण घेतलेला निर्णय योग्य असल्याचे सांगितले.

उमेदवारीसाठी मुलाखती दिलेल्या इच्छुकांनी २७ रोजी पत्रकार परिषद घेऊन दिलीप बनसोड यांच्या उमेदवारीला कडाडून विरोध करीत पटोलेंनी अर्जुनी मोरगाव विधानसभेसाठी पार्सल रुपी दिलेला उमेदवार परत घेऊन स्थानिकांना उमेदवारी देण्याची भूमिका घेतली. पटोलेंनी योग्य निर्णय न घेतल्यास बन्सोड यांच्या विरुद्ध अपक्ष निवडणूक लढवू अशी भूमिकाही ईच्छूकांनी घेतली. त्यामुळे काँग्रेस उमेदवार बन्सोड यांच्या अडचणी वाढणार आहेत.

# नक्षल्यांचे घातपाताचे मनसुबे उधळले

**गोंदिया:** जिल्हा पोलिस दल आणि सी ६० पोलिस दलाने राबविलेल्या संयुक्त कारवाईदरम्यान नक्षल्यांनी दगडांमध्ये लपवून ठेवलेला स्फ्फोटकांचा साठा सर्च ऑपरेशनदरम्यान जप्त केला. ही कारवाई सालेकसा तालुक्याच्या छत्तीसगड सीमेवरील टाकेझरी जंगलात गुरुवार, २४ ऑक्टोबर रोजी करण्यात आली.



महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने अतिसंवेदनशील नक्षलग्रस्त भागातील नक्षल हालचाली लक्षात घेता महाराष्ट्र सीमेलगतच्या मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्य सीमा भागातील क्षेत्रात पोलिसांची सातत्याने गस्त आणि सर्च ऑपरेशन सुरू आहे. निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी नक्षल गतीविधींवर आळा, प्रतिबंध घालण्याकरिता जिल्ह्यात कार्यरत सी ६० पथके, सशस्त्र दूरक्षेत्र, नक्षल प्रभावित भागातील पोलिस ठाण्यांतील अधिकाऱ्यांना प्रभावीपणे जंगल अभियान, सर्च पेट्रोलिंग करण्याचे निर्देश पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने गुरुवारी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास सालेकसा पोलिस ठाण्याचे बीडीडीएस पथक, श्वान पथकातील श्वान कॅण्डी, ऑपरेशन सेलचा स्टाफ रवाना झाले. सीमावर्ती भागा–तील टाकेझरी जंगल परिसरात पेट्रोलिंग करीत असताना पेट्रोलिंग पथकाला गोपनीय माहिती मिळाली.

टाकेझरी जंगल परिसरातील पहाडावरील दगडांमध्ये आक्षेपार्ह साहित्य लपवून ठेवल्याचे सूत्रांनी सांगितले.


माहितीनुसार पाहणी केली असता पहाडावरील दगडांमध्ये एका पारदर्शी प्लास्टिक पॉलिथिनच्या तुकड्यामध्ये आ–क्षेपार्ह साहित्य मिळाले. त्यात इलेक्ट्रीक वायर ४ बंडल, लाल रंगाचे कॉर्डेक्स १८ फूट, पांढरे युरियासारखे दाणेदार पदार्थ २ किलो, गडद हिरव्या व सिल्वर रंगाचे सेमीसॉलिड डिझेलसारखा वास येणारा पदार्थ, १२ व्होल्ट बॅटरी, ५ लीटर क्षमतेचा अॅल्युमिनिअम कुकर, जिलेटिनच्या तीन कांड्या, तीन प्लग, इलेक्ट्रीक डेटोनेटरसदृश वस्तू, पॅकिंग टेप दोन नग, अंदाजे ५ ते ७ सेमी लांबीचे लहान–मोठे एकूण ५२ नग लोखंडी खिळे, अंदाजे अर्धा ते ४ सेमी आकाराचे धारदार व नोकदार लहानमोठे एकूण ७८ नग लोखंडाचे तुकडे, जाड काचेचे धारदार व नोकदार ओबडधोबड आकाराचे एकूण १९० नग लहानमोठे तुकडे असे साहित्य आढळून आले.

निवडणुकीच्या तोंडावर पोलिसांनी केलेली ही मोठी कारवाई आहे. वरिष्ठांच्या सु–चनेनुसार सालेकसाचे पोलिस निरीक्षक भुषण बुराडे यांच्या तक्रारीवरून भारत सरकारद्वारे प्रतिबंधीत आरोपी भा.क.पा. (माओवादी) दरेकसा, मलाजखंड, बोडला, के. बी. दलम, नक्षल संघटनेचे माओवादी यांचे विरो–धात सालेकसा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९, ६१ (२) भा. न्या. सं. सहकलम १६, २०, २३ बेकायदेशीर हालचाल प्रतिबंधक कायदा, सहकलम ४, ५ भारतीय स्फ्फोटक पदार्थ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# “दादा, हा “विश्वासघात” जनतेला “पटेल”च असं नाही!”

**गोंदिया:–** विधानसभेतील विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापुरेंनी तिकीट कापल्यानंतर भावनिक उद्गार काढले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने माजी मंत्री राजकुमार बडोले यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतल्याने चंद्रिकापुरेंनी त्यांच्या समर्थकांसह मोठा धक्का घेतला आहे.

चंद्रिकापुरे यांनी सांगितले की, जेव्हा अजित पवार यांनी महायुतीत जाण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांना इच्छा नसतानाही निष्ठावान कार्यकर्त्याप्रमाणे त्यांच्यावर विश्वास ठेवावा लागला. मतदारसंघातील नागरिकांना त्यांनी महायुतीची भूमिका पटवून दिली, मात्र ऐनवेळी त्यांना बाजूला सारत माजी मंत्री बडोले यांना तिकीट देण्यात आले. या बदलामुळे चंद्रिकापुरे यांनी आपल्या पाठीत खंजीर खुपसल्याची भावना व्यक्त केली आहे.चंद्रिकापुरे यांना तिकीट कापल्यानंतर भाजप नेते प्रफुल्ल पटेल यांच्या भेटीमुळे हे निर्णय झाले असल्याची चर्चा आहे. चंद्रिकापुरेंनी स्पष्ट केले की, हा निर्णय जनतेला स्वीकाराह नाही आणि आगामी निवडणुकीत मतदारसंघातील जनता याचा हिशोब घेईल. चंद्रिकापुरेंनी आता जनतेमध्ये जाऊनच आपली भूमिका स्पष्ट करण्याचा निर्धार केला आहे आणि त्यांनी विधानसभेच्या तिकीटासाठी थेट जनतेकडेच मागणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अर्जुनी मोरगाव विधानसभेत राजकीय वातावरण तापले असून, चंद्रिकापुरेंची पुढील भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


दादा हा 'विश्वासघात' जनतेला 'पटेल'च असं नाही....!

प्रति
आदरणीय अजित दादा

नमस्कार,
मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा निष्ठावंत व एकनिष्ठ कार्यकर्ता बोलतोय.
आज माझं तिकीट कापण्यात आल्याचं समजलं, मुंबईत येऊनही रिकाम्या हाताने परत यावं लागलं, याचं मनापासून दुःख झालंय.
दादा, जेव्हा महायुतीत जाण्याचा निर्णय तुम्ही घेतला तेव्हा इच्छा नसतानाही आपल्यावर श्रद्धा आणि विश्वास ठेऊन मी आणि माझा मतदारसंघ तुमच्यासोबत राहिला. आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवला, पण तुम्ही माझा विश्वासघात केला. केवळ, माझाच नाही तर माझ्यासह माझ्या अर्जुनी मोरगाव मतदारसंघातील लाखो नागरिकांचा हा विश्वासघात आहे. मीच राष्ट्रवादीचा उमेदवार असेन, असं सांगत मी मतदारसंघातील गावं न गावं पिंजून काढली, येथील जनतेला भेटून आपली भूमिका कशी बरोबर आहे, हे समजावलं. पण, ऐनवेळी माझ्याच पाठीत खंजीर खुपसला.

दादा, पाठीत खंजीर खुपसल्याचे वाईट वाटते हो, पण ज्या हातात खंजीर आहे, तो हात आपलाच असल्यावर जास्त वाईट वाटते. दोन दिवसांपूर्वी भाजपचा नेता प्रफुल भाई पटेल यांना भेटला आणि त्यांना पटलं.
हे सहजच पटेल असं नक्कीच वाटत नाही, यात मोठी डील झालीय
अशीच चर्चा आता मतदारसंघात, जनतेत सुरू आहे.

कालपर्यंत मी भाजपचा निष्ठावंत, कट्टर म्हणणार नेता आज सुमडीत आपल्या पक्षात आला. दादा, नेतेमंडळी पक्ष बदलायला मोकळी असते, पण सतरंज्या उचलणारा कार्यकर्ता एकनिष्ठतेची अग्निपरीक्षा देत असतो. म्हणूनच, आमच्या इथल्या नेत्याची सरड्यासारखी बदललेली भूमिका पाहून वाईट वाटलं. मला आणि माझ्या मतदारसंघातील जनतेलासुद्धा.

उद्याच आजसुद्धा मला माहिती नाही, पण मतदारसंघातील जनता हे विसरणार नाही, हा विश्वासघातकीपणा लक्षात ठेवेल, तुम्हाला कदाचित हे पटलं असेल, पण माझ्या लोकांना हे अजिबात 'पटेल' असं नाही. त्यामुळेच याच निवडणुकीत याचा हिशेब होणार आणि जनताच सुफडासाफ करणार. कारण, आता मी जनतेमध्ये जाऊनच दाद मागणार आहे, आता जनतेलाच विधानसभेचं तिकीट मागणार आहे.

अर्जुनी-मोरगावमतदारसंघाचा,
**स्वाभिमानी जनसेवक**
मनोहर चंद्रिकापुरे

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापूरे यांना शरद पवार यांची मुंबईत भेट घेतली असल्याने पवार काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे. अशातच चंद्रिकापूरे यांनी अजित पवार व प्रफुल्ल पटेल यांच्यावर खरमरीत टिका केली आहे. मनोहर चंद्रिकापूरे यांचा मुलगा डॉ.सुगत चंद्रिकापूरे यांनी गेल्या काही महिन्यापुर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या १५ नगरसेवकासंह मुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. तेव्हापासूनच चंद्रिकापूरे यांच्याबद्दल प्रफुल्ल पटेलांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती. आता पक्षाने उमेदवारीच नाकारल्याने त्यांनीही शरद पवार राष्ट्रवादी काँगेसकडून प्रतिसाद न मिळाल्यास मुलाला रिंगणात उतरवण्याची तयारी सोशल मिडियावर सुरु केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या मतदारसंघात निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.